# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
# (नियोजन विभाग)

वाचा:-१) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग,शासन निर्णय क्रस्थाविका/२००७/प्र.क्र.-१७० /का-१४८२ दि.१३.९.२०११
२) मा.आ श्री. पाशा पटेल विधान परिषद सदस्य यांचे दि. ४.०७.२०१२ चे शिफारस पत्र.
३) कार्यकरी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग निलंगा यांचे पत्र.कप्रशा/रस्ते-३४०८ दि. १.११.२०११.

---

जा.क्र.२०१२-१३/नियो/आस्थाविका /सं.स-३/ प्रमा./ १४८४ दि. ०६/११/२०१२.

**//प्रशासकीय मंजुरी आदेश//**

उपरोक्त नमुद केलेल्या शासन निर्णयाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी. जिल्हाधिकारी, लातूर आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात खालील नमुद केलेल्या कामास पुढील अटी व शर्तीवर प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर कामे मा.आ.श्री. पाशा पटेल विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य यांनी प्रस्तावित केले असुन मा.आ. महोदयांनी सुचविलेली दोन कामे सर्वसाधारण योजनांतर्गत मंजुर करण्यांत येत आहे. प्रस्तावित कामे खाली दर्शविलेल्या संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेकडे सोपविण्यांत येत आहे.

| प्रमा आ.क्र. | मंजुर कामाचे नांव | कार्यान्वयीन यंत्रणा | तांत्रिक मान्यता क्रमांक | प्र.मा. किंमत (लाखात ) | परिरक्षण करणा-या यंत्रनेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| १ | मौ. कलमुगळी, ता. निलंगा जि. लातूर येथील मुस्लीम स्मशानभूमीस संरक्षण भिंत बांधणे व पाणी पुरवठा कार्यान्वीत करणे. | कार्यकारी अभियंता सा. बांधकाम विभाग निलंगा | ३८ दि.१.११.२०१२ | १०.०० | ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय . कलमुगळी, ता. निलंगा जि. लातूर |
| २ | मौ. कलमुगळी, ता. निलंगा जि. लातूर येथील सामाजिक सभागृह बांधणे. | कार्यकारी अभियंता सा. बांधकाम विभाग निलंगा | ३९ दि.१.११.२०१२ | १५.०० | ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय . कलमुगळी, ता. निलंगा जि. लातूर |
| | **एकूण रक्कम रू** | | | **२५.००** | |

**या आदेशान्वये एकूण रक्कम रू. २५.०० लक्ष (रू.पंचेविस लक्ष केवळ) रक्कमेच्या** दोन **कामास प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.**
**सदरची प्रशासकीय मान्यता खलील अटी व शर्तीवर देण्यांत येत आहे.**

**अटी व शर्ती**

१. ज्या कामास या आदेशाद्वारे प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.त्या कामाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करण्यापुर्वी हे काम कोणत्याही पाटबंधारे / जलविद्युत /पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही. किंवा अशा प्रकल्पामुळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची पुन्हा खात्री करून घेतली पाहीजे.

२. सदरची कामे या विशेष कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत योजना /कार्यक्रम अथवा इतर योजनेत्तर कामात समाविष्ट नाहीत याची खात्री घेउनच काम सुरू करावे.

३. सदरच्या कामांना सक्षम अधिका-याने तांत्रिक मान्यता दिली आहे याची खात्री करून घ्यावी. जिल्हास्तरीय अधिका-यानी कमीत कमी एका वेळेस काम चालु असतांना व काम भैतिक दृष्टया पुर्ण झाल्यावर एक वेळेस कामाचे मुल्यमापन करण्यासाठी कामाच्या ठिकणी जाणे गरजेचे आहे. तसेच कामाची गुणवत्ता राखण्यासाठी सर्वस्वी जबाबदारी अधिका-यांची आहे.

४.या कार्यक्रमातील कामाचा वापर सार्वजनिक स्वरूपाचा असल्यामुळे शासकीय अथवा स्वायत्व जागा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी जर खाजगी जागा असल्यास लागणा-या जागेचे दानपत्र रजिष्टर करून घेउनच सुरूवात करावी.

५.शासनाकडुन योजनांतर्गत घ्यावयाच्या कामास नियोजन विभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग / ग्रामविकास विभाग यांनी विहित केलेले निकष पाळावयाचे असुन शासनाच्या मापदंडानुसार खर्च करावयाचे असुन रस्त्याच्या कामामध्ये रस्त्याची मजबुती करण्यास या आदेशान्वये प्रशासकीय मंजुरी दिली असल्यास महाराष्ट्र नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-१०९७/प्रक्र.३१२/ का-१४४५ दि.१ जुन १९९८ अन्वये पुर्तता करूनच कामे हाती घ्यावी.

६.प्रशासकीय मंजुरीच्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च करण्यांत येवू नये.

७.शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार सदरची कामे पुर्ण होताच कामाच्या दर्शनिभागावर आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१२-



दुरध्वनी क्रमांक (०२३८२) २४५१७२ फॅक्स क्रमांक (०२३८२) २४२३३०
संकेतस्थळ WWW.Latur.nic.in E-Mail ID Collector_latur@Maharashtra.gov.in dpolatur@yahoo.com

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
# (नियोजन विभाग)

१३ मध्ये घेण्यांत आलेले काम व खर्चाची रक्कम इत्यादी माहितीचा फलक लावावा. हे काम सुरू करण्यापुर्वी संबंधीत संस्थेचे / अभिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व तसेच देखभाल व दुरूस्तीचे हामी पत्र संबंधीत संस्थेकडुन घेवून या कार्यालयास पाठवावे या बाबत वैयक्तीक जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

८.या कामाचे निरिक्षण व तपासणी जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडुन अथवा महाराष्ट्र शासन नियोन विभागाच्या अधिका-याकडुन होवू शकेल.

९.या कार्यक्रमाखालील येणा-या खर्चचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यांत यावा व खर्चाचा मासीक प्रगती अहवाल. महिना संपल्यानंतर पुढील महिण्याच्या ५ तारखेपर्यंत या कार्यालयास पाठवावा. तसेच रोजगार हमी योजना करिता घालुन दिलेल्या लेखा पद्वतीचा अवलंब करावयाचा आहे.

१०.नगर पालीका क्षेत्रातील कामे जर नगर पालीकेकडुन कार्यान्वीत होत असतील तर त्या कामावर नगर रचनाकार यांनी निरिक्षण करावे व कामात आढळुन आलेल्या त्रुटीची अंदाजपत्रकानुसार पुर्तता करून घ्यावी.

११.सदरची कामे एक वर्षात पुर्ण करणे अपेक्षित आहे. काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचे दाखले देखभाल व दुरूस्ती / काम हस्तांतरणकेल्याचा उाखला व नोदवही भरून दोन प्रतीत तसेच मंजुर काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा फोटो या कार्यालयास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत यंत्रणेवर राहील.

१२.या कार्यक्रमात मतदारसंघ निहाय निधी उपलब्ध होत असल्यामुे निधीची मागणी मतदारसंघ निहाय व कामनिहाय करावी.

१३.या कार्यक्रमावर होणारा खर्च २०११-१२ या वित्तीय वर्षात खालील लेखा शिर्षाखाली होणा्-या तरतुदीतुन भागविण्यांत यावा व त्याच लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

**नियोजन विभाग ( मागणीक्र.ओ-९)**
**४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च**
**१०२- सामुहिक विकास, पंवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना (१)**
**बहुउद्देशिय कार्यक्रम, (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम ( संकेतांक-४५१५००१२)**

**प्रति,**

१ कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग ,निलंगा यांना माहितीस्तव

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी , लातूर**

**प्रत :-माहितीस्तव**

१. मा. आ.श्री. पाशा पटेल विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य , विठ्ठल हाउसिंग सोसायटी चर्चजवळ नांदेड रोड लातूर यांना माहीतीस्तव सादर.
२. अधिक्षक अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग , उस्मानाबाद. यांना माहीतीस्तव सादर.
३. निवड नस्ती.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी , लातूर**



दुरध्वनी क्रमांक (०२३८२) २४५१७२ फॅक्स क्रमांक (०२३८२) २४२३३०
संकेतस्थळ WWW.Latur.nic.in E-Mail ID Collector_latur@Maharashtra.gov.in dpolatur@yahoo.com